**फाईल क्र.1442/गट -क संयुक्त-क.स./2019/तेरा-ब** दि. 21 जुलै, 2020

**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
**कर सहायक (मुख्य) परीक्षा-2019**
**— अंतिम निकाल —**
**घोषणा**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दि. 6 ऑक्टोबर, 2019 व 3 नोव्हेंबर, 2019 रोजी **"महाराष्ट्र गट-क सेवा मुख्य परीक्षा-2019 मधील "कर सहायक" (जाहिरात क्र. 16/2019)"** या संवर्गातील एकूण 126 पदांकरिता परीक्षा घेण्यात आली होती. प्रस्तुत परीक्षेसाठी संबंधित उमेदवारांनी अर्जात केलेले दावे निकालासाठी विचारात घेऊन सदर दाव्यांच्या अनुषंगाने शिफारसपात्र उमेदवारांची पात्रता शासन स्तरावर,मूळ प्रमाणपत्रांआधारे तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, सदर परीक्षेचा निकाल दि.21 जुलै, 2020 रोजी जाहीर करण्यात आला आहे.

2. सदर परीक्षेमध्ये **अमरावती** जिल्ह्यातील **श्री. मोहम्मद शाहिद मोहम्मद अय्युब (बैठक क्र. NG001258)** हे राज्यात प्रथम आले आहेत. मागासवर्गवारीतून **सांगली** जिल्ह्यातील **श्री. पाटील मोहन अशोक (बैठक क्र. PN002326)** तसेच महिलांमध्ये **नाशिक** जिल्ह्यातील **श्रीमती निकम देवयानी दौलतराव (बैठक क्र. PN001335)** ह्या प्रथम आल्या आहेत.

3. प्रस्तुत निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यांसंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा.न्यायालयात/मा.न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणांवरील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

4. अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेडाळूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.1 जुलै, 2016 रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेल्या दि.18 ऑगस्ट, 2016 व दि. 11 मार्च, 2019 रोजीच्या शुध्दीपत्रकातील तरतुदीनुसार आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकीत गट-क पदासाठी निश्चित केलेली क्रीडाविषयक अर्हता व क्रीडा प्रमाणपत्र पूर्व परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याची अंतिम दिनांकास किंवा तत्पूर्वी धारण करणे आवश्यक राहील. तसेच त्यासंदर्भातील संबंधित विभागीय क्रीडा उपसंचालकांचा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल नियुक्तीपूर्वी शासनाकडे सादर करणे आवश्यक आहे.

5. प्रस्तुत परीक्षेच्या ज्या उमेदवारांना त्यांच्या उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची आहे, अशा उमेदवारांनी गुणपत्रके प्रोफाईलमध्ये पाठविल्याच्या दिनांकापासून 10 दिवसांत, आयोगाकडे ऑनलाईन पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. (कृपया आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांनी "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मधील सूचना क्र. 3.8 पहावी).

6. सदर निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे.

**उपसचिव (परीक्षा-2)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**

**ठिकाण : मुंबई**